अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# सरकारी कामे आणि भ्रष्टाचाराची चौकडी

कोणत्याही सरकारी कार्यालयामध्ये कंत्राटदार, सरकारी अधिकारी, एखादा राजकीय पुढारी आणि या तिघांशीही संबंध असणारा एखादा दलाल अशी चौकट काम करीत असते. अधिकाधिक कामे आपल्या पदरात पाडून घेण्याकरिता कंत्राटदार वाट्टेल त्या थराला जात असतात. सरकारी कामाचे टेंडर आपल्या खिशात यावे यासाठी ते मोर्चेबांधणी करून आपली तिजोरी भरण्याचा प्रयत्न करतात. मग ती मुंबई महापालिका असो, मंत्रालय असो किंवा सर्वाधिक टेंडर निघणारे संरक्षण खाते असो या सर्व ठिकाणी कामे मिळवण्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांना व राजकीय पुढाऱ्यांना हाताशी धरले जाते. टक्केवारीचा हिशेब मांडून टेंडर मिळण्याची सोय केली जाते यावर त्यातून होणारा भ्रष्टाचार अक्षरश: कोट्यवधी रुपयांचा असतो. ज्या कामाचा खर्च दोन कोटीही होऊ शकणार नाही त्याठिकाणी तीन कोटींची निविदा मंजूर केली जाते आणि त्यातून संबंधित सरकारी अधिकारी आणि एखाद्या राजकीय पुढाऱ्याला कमिशन पोहोचवले जाते. ही पद्धत इतकी घट्ट बसली आहे की ती मोडून काढणे अजूनही कोणालाच शक्य झालेले नाही. सरकारी कामाच्या टेंडरमध्ये चालणारा हा भ्रष्टाचार रोखण्यासाठी ई-निविदा हा प्रकार सुरू केला गेला म्हणजेच ऑनलाईन कामाचे टेंडर मागविले जाते आणि कमी किंमत असलेल्या कंत्राटदाराला काम दिले जाते. म्हणजे कंत्राटदाराला कुठेही भ्रष्टाचार करता येऊ नये किंवा त्याने कोणामार्फत दबावही आणू नये, असा त्यामागचा हेतू असतो. परंतु या ई-निविदा प्रकाराला सुद्धा हरताळ फासण्याचे काम सरकारी अधिकारी कंत्राटदार आणि राजकीय पुढारी संगनमताने करीत आहेत. असाच प्रकार मुंबई महापालिकेबाबत घडला. पालिका आयुक्तांनी सुरू केलेली ही ई-निविदा प्रक्रिया अयशस्वी कशी ठरेल, असा जोरदार प्रयत्न केला गेला आहे. याचा अर्थ कंत्राट मंजूर करून घेणारी चौकटी अजूनही सरकारी कार्यालयामधून कशी पॉवरफूल आहे हे सिद्ध होते.

### महापालिकांमधले सिंडिकेट

मुंबई महापालिकेच्या बाबतीत तर कंत्राटदार आणि त्यांची लॉबी जोरदार काम करीत असते. अर्थात ही परिस्थिती अन्य महापालिकांमध्ये पाहायला मिळते. स्थायी समितीला मोठमोठ्या कामाचे कंत्राट मंजूर करण्याचे अधिकार असतात. अशा वेळी स्थायी समितीचे सदस्य संगनमताने कुठला प्रस्ताव पारित करायचा हे आधीच ठरविण्याचा प्रकार घडतो. अनेक वर्षे मुंबई महापालिकेच्या स्थायी समितीत ठराविक कंत्राटदारांची कामे मंजूर करून घेणारी एक सिंडिकेट लॉबीच तयार झाली होती. या लॉबीला भेटले की कंत्राटदाराची कामे सहजपणे मंजूर होत असत. अजूनही हा प्रकार महापालिकेत बऱ्यापैकी सुरू आहे. आता तर नागपूर, औरंगाबाद, पुणे यासारख्या महापालिकांमध्ये सुद्धा कंत्राटदार, सरकारी अधिकारी, राजकीय पुढारी आणि एखादा दलाल याची चौकडी सांगेन त्यांना कामे देण्याचा प्रकार घडतो. ही पद्धत आता अन्य छोट्या महापालिकांमध्येही पसरते आहे. टक्केवारीवर कामे मिळविण्यात कंत्राटदार इतके तरबेज झाले आहेत की त्यांना त्यासाठी फारसे कष्ट करावे लागत नाहीत. ई-निविदा म्हणजेच ऑनलाईन पद्धत सुरू करूनही मुंबई महापालिकेसारख्या संस्थेमध्ये जर त्याचा प्रयोग यशस्वी होऊ दिला जात नसेल तर अन्य सरकारी कार्यालयामध्ये सुध्दा हा ई-निविदा प्रकार कितपत यशस्वी ठरत असेल याबद्दल प्रश्न निर्माण होतो. कारण मोठमोठ्या सरकारी कार्यालयामध्ये अब्जावधीची कामे मंजूर करून घेण्याकरिता केवळ ही ई-निविदा पद्धत उपयोगी पडत असेल याच्यावर विश्वास ठेवणे कठीण आहे. आजदेखील साध्या महापालिकेतसुद्धा आमदार खासदारांची शिफारस पत्रे दिली जात असतात. केंद्र सरकारच्या अनेक कार्यालयामध्येसुद्धा एखादे काम विशिष्ट कंपनीला मिळावे यासाठी खासदारांचे गट आपली प्रतिष्ठा पणाला लावत असतात अशा पद्धतीने भ्रष्टाचाराचा हा कर्करोग सर्वक्षेत्रांमध्ये धुमाकूळ घालतो. त्यातूनच सरकारी प्रकल्पांच्या किमती अव्वाच्यासव्वा वाढतात आणि सरकारी तिजोरीची लूट केली जाते.

### त्यासाठीच लोकपाल विधेयक

आपल्याला कधीही कल्पना येणार नाही किंवा खरेही वाटणार नाही इतक्या बेमालूमपणे कंत्राटदार कामे मिळवितात. त्यासाठी अधिकारी आणि पुढारी यांची व्यवस्थितपणे मदत घेतली जाते. एखादे काम विशिष्ट कंपनीला मिळावे यासाठी तशी परिस्थिती निर्माण केली जाते आणि हे काम त्या कंपनीशिवाय दुसरी कोणतीही कंपनी करू शकत नाही, असे वातावरणही निर्माण केले जाते. त्यातून अधिकारी आणि राजकीय पुढारी आपण जणू काही फार मोठे सामाजिक काम केले, असे चित्र निर्माण करतात. प्रत्यक्षात ते सरकारी काम पूर्ण करताना या चौकडीने आपले उखळ पांढरे करून घेतलेले असते. सामान्य माणसाला असे वाटते की, सरकारने एक चांगले काम केले. परंतु त्या निमित्ताने सहजपणे होणारा भ्रष्टाचार हा तितक्याच सहजपणे दृष्टीआडही केला जातो. भ्रष्टाचार रोखला जावा यासाठीच तर अण्णा हजारे यांनी लोकपाल विधेयकाची मागणी केली होती. भ्रष्टाचार करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांना आणि राजकीय पुढाऱ्यांनादेखील शिक्षा झाली पाहिजे, अशी तरतूद या विधेयकामध्ये आता केली गेली आहे. परंतु त्याची खऱ्या अर्थाने अंमलबजावणी होईल तेव्हाच भ्रष्टाचार रोखला जाऊ शकेल. छोट्या छोट्या सरकारी कामामधून पसरत जाणारा हा भ्रष्टाचार रोखण्याची गरज आहे. त्यासाठी ई-निविदासारखे प्रकार कठोरपणे राबविले गेले पाहिजेत आणि त्याला विरोध करणाऱ्यांना जाब विचारला गेला पाहिजे.